# ५२ श्लोकी गुरुचरित्र (52 Shloki Gurucharitra)

श्रीगणेशाय नमः । श्रीमद्दत्तात्रैयगुरुवे नमः ॥

अथ ध्यानम्
दिगंबरं भस्मसुगंधलेपनं चक्रं त्रिशूलं डमरुं गदांच ।
पद्मासनस्थं रविसोमनेत्रं दत्तात्रयं ध्यानमभिष्ट सिद्धिदम् ॥ १ ॥

काषायवस्त्रं करदंडधारिणं कमंडलुं पद्मकरेण शंखम् ।
चक्रं गदाभूषितभूषणाढ्यं श्रीपादराजं शरणं प्रपद्ये ॥ २ ॥

कृते जनार्दनो देवस्त्रेतायां रघुनंदनः ।
द्वापारे रामकृष्णौ च कलौ श्रीपादश्रीवल्लभः ॥ ३ ॥

ॐ नमोजी विघ्नहरा ।

गजानना गिरिजाकुमरा । जयजयाजी लंबोदरा । शकदंता शूर्पकर्णा ॥ १ ॥

त्रिमूर्तिराजा गुरु तूंचि माझा । कृष्णातिरी वास करुनी ओजा ॥
सद्भक्त तेथे करिती आनंदा । त्या देव स्वर्गी बघती विनोदा ॥ २ ॥

जयजयाजी सिद्धमुनी । तूं तारक भवार्णावांतुनी ॥
संदेह होता माझे मनी । आजि तुवां कुडें केले ॥ ३ ॥

ऐशी शिष्याची विनंती । ऐकुनि सिद्ध काय बोलती ॥
साधु साधु तुझी भक्ति । प्रीती पावो श्रीगुरुचरणी ॥ ४ ॥

भक्तजनरक्षणार्थ । अवतरला श्रीगुरुनाथ ॥
सागरपुत्रांकारणें भगीरथें । गंगा आणिली भूमंडळी ॥ ५ ॥

तीर्थे असली अपार परी । समस्त सांडुनि प्रीति करी ॥
कैसा पावला श्रीदत्ताची । श्रीपादश्रीवल्लभ ॥ ६ ॥

ज्यावरी असे श्रीगुरुची प्रीति । तीर्थमहिमा ऐकावया चित्ती ॥
वांच्छा होतसे त्या ज्ञानज्योती । कृपामूर्ति यतिराया॥ ७ ॥

गोकर्णक्षेत्री श्रीपादयती । राहिले तीन वर्षे गुप्ती ॥
तेथूनी गुरु गीरीपुरा येती । लोकानुग्रहाकारणें ॥ ८ ॥

श्रीपाद कुरवपुरी असतां । पुढें वर्तली कैसी कथा ॥
विस्तारुनी सांग आतां । कृपामूर्ति दातारा ॥ ९ ॥

सिद्‌ध म्हणे नामधारकासी । श्रीगुरु महिमा काय पुससी ॥
अनंतरुपे परियेसी । विश्र्वव्यापक परमात्मा ॥ १० ॥

सिद्‌ध म्हणे ऐक वत्सा । अवतार झाला श्रीपादहर्षा ॥
पूर्ववृत्तांत ऐकिला ऐसा । कथा सांगितली विप्रस्त्रियेची ॥ ११ ॥

श्रीगुरु म्हणती जननीसी । आम्हा ऐसा निरोप देसी ॥
अनित्य शरीर तूं जाणसी । काय भरवंसा जिविताचा ॥ १२ ॥

श्रीगुरुचरित्र कथामृत । सेवितां वांच्छा अधिक होत ॥
शमन करणार समर्थ । तूचि एक कृपासिंधु ॥ १३ ॥

ऐकुनि शिष्याचे वचन । संतोष करी सिद्‌ध आपण ॥
श्रीगुरु चरित्र कामधेनू जाण । सांगता झाला विस्तारे ॥ १४ ॥

ऐक शिष्या शिरोमणी । धन्य धन्य तुझी वाणी ॥
तुझी भक्ति श्रीगुरुचरणी । लीन झाली परियेसी ॥ १५ ॥

विनवी शिष्य नामांकित । सिद्‌ध योगियातें पुसत ॥

सांगा स्वामी वृत्तांत । श्रीगुरुचरित्र विस्तारें ॥ १६ ॥

ऐक शिष्या नामकरणी । श्रीगुरुभक्त शिखामणी ॥
तुझी भक्ति श्रीगुरुचरणी । लीन झाली निर्धारे ॥ १७ ॥

ध्यान लागले श्रीगुरुचरणी । तृप्ति नोव्हें अंतःकरणी ॥
कथामृत संजिवनी । आणिक निरोपावी दातारा ॥ १८ ॥

अज्ञान तिमिर रजनीत । निजलो होतो मदोन्मत्त ॥
श्रीगुरुचरित्र वचनामृत । प्राशन केले दातारा ॥ १९ ॥

स्वामी निरोपिलें आम्हांसी । श्रीगुरु आले गाणगापुरासी ॥
गौप्यरुपें अमरपुरासी । औदुंबरी असती जाण ॥ २० ॥

सिद्ध म्हणे नामधारका । ब्रह्मचारी कारणिका ॥
उपदेशी ज्ञान विवेका । तये प्रेत जननीसी ॥ २१ ॥

तुझा चरणसंपर्क होता । झाले ज्ञान मज आतां ॥
परमार्थी मन ऐकता । झाले तुझे प्रसादें ॥ २२ ॥

लोटांगणे श्रीगुरुसी । जाऊनि राजा भक्तिसी ॥
नमस्कारी विनयेसी । एकभावें करुनियां ॥ २३ ॥

शिष्यवचन परिसुनी । सांगता झाला सिद्धमुनी ॥
ऐक भक्ता नामकरणी । श्रीगुरुचरित्र अभिनव ॥ २४ ॥

सिद्ध म्हणे ऐक बाळा । श्रीगुरुची अगम्य लीला ॥
सांगता न सरे बहुकाळा । साधारण मी सांगतसे ॥ २५ ॥

श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी । नको भ्रमुरे युक्तिसी ॥
वेदांत न कळे ब्रह्मयासी । अनंत वेद असती जाण ॥ २६ ॥

चतुर्वेद विस्तारेसी । श्रीगुरु सांगती विप्रासी ॥
पुढे कथा वर्तली कैसी । विस्ताराची दातारा ॥ २७ ॥

नामधारक म्हणे सिद्धासी । पुढील कथा सांगा आम्हांसी ॥
उल्हास होतो मानसी । श्रीगुरुचरित्र अति गोड ॥ २८ ॥

पुढे कथा कवणेपरी । झाली असे गुरुचरित्री ॥
निरुपावे विस्तारी । सिद्धमुनी कृपासिंधु ॥ २९ ॥

श्रीगुरुचरित्र सुधारस । तुम्ही पाजिला आम्हांस ॥
परी तृप्त नव्हे गा मानस । तृषा आणिक होतसे ॥ ३० ॥

सिद्ध म्हणे नामधारका । पुढें अपूर्व झाले ऐका ॥
योगेश्र्वर कारणिका । सांगे स्त्रियांचे स्वधर्म ॥ ३१ ॥

पतिव्रतेची रीती । सांगे देवासी बृहस्पती ॥
सहगमनाची फलश्रुती । येणेपरी निरुपिली ॥ ३२ ॥

श्रीगुरु आले मठासी । पुढे कथा वर्तली कैसी ॥
विस्तारुनि आम्हांसी । निरुपावें स्वामिया ॥ ३३ ॥

श्रीगुरु म्हणती दंपतीसी । ऐका पाराशरऋषी ॥
तया काश्मीररायासी । रुद्राक्षमहिमा निरुपिला ॥ ३४ ॥

पुढें कथा वर्तली कैसी । विस्तारुनि सांगा वहिली ॥
मति माझी असे वेधिली । श्रीगुरुचरित्र ऐकावया ॥ ३५ ॥

गांणगापुरी असतां श्रीगुरु । महिमा झाला अपरंपारु ॥
सांगता नये विस्तारु । तावन्मात्र सांगतसे ॥ ३६ ॥

ऐसा श्रीगुरु दातारु । भक्तजना कल्पतरु ॥
सांगता झाला आचारु । कृपा करुनि विप्रांसी ॥ ३७ ॥

आर्त झालो मी तृषेचा । घोट भरवीं गा अमृताचा ॥
चरित्रभाग सांगे श्रीगुरुचा । माझे मन निववी वेगी ॥ ३८ ॥

सिद्‌ध म्हणे नामधारका । अपूर्व झाले ऐका ॥
साठ वर्षे वांझ देखा । पुत्रकन्या प्रसवली ॥ ३९ ॥

सिद्‌ध म्हणे नामधारका । अपूर्व वर्तले आणिक ऐका ॥
वृक्ष झाला काष्ट सुका । विचित्र कथा परियेसा ॥ ४० ॥

जयजयाजी सिद्‌धमुनी । तू तारक या भवार्णवांतुनी ॥
नानाधर्म विस्तारुनि । श्रीगुरुचरित्र निरुपिले ॥ ४१ ॥

मागें कथानक निरुपिले । सायंदेव शिष्य भले ॥
श्रीगुरुंनी त्यांसी निरुपिलें । कलत्र पुत्र आणि म्हणती ॥ ४२ ॥

श्रीगुरु म्हणती द्‌विजासी । या अनंत व्रतासी ॥
सांगेन ऐका तुम्हांसी । पूर्वी बहुती आराधिले ॥ ४३ ॥

श्रीगुरु माझा मलिकार्जुन । पर्वत म्हणजे श्रीगुरु भुवन ॥
आपण नये आतां येथून । सोडून चरण श्रीगुरुचे ॥ ४४ ॥

तू भेटलासी मज तारक । दैन्य गेले सकळहि दुःख ॥
सर्वाभीष्ट लाधले सुख । श्रीगुरुचरित्र ऐकतां ॥ ४५ ॥

गाणगापुरीं असतां श्रीगुरु । ख्याती झाली अपारु ॥
लोक येती थोरथोरु । भक्त बहुत झाले असती ॥ ४६ ॥

सांगेन ऐका कथा विचित्र । जेणें होय पतित पवित्र ॥
ऐसे हें गुरुचरित्र । तत्परतेसी परियेसी ॥ ४७ ॥

श्रीगुरु नित्य संगमासी । जात होते अनुष्ठानासी ॥

मार्गांत शूद्र परियेसी । शेती आपुल्या उभा असे ॥ ४८ ॥

त्रिमूर्तीचा अवतार । वेषधारी झाला नर ॥
राहिले प्रीती गाणगापुर । कवण क्षेत्र म्हणूनिया ॥ ४९ ॥

तेणे मागितला वर । राज्यपद धुरंधर ॥
प्रसन्न झाला त्यासी गुरुवर । दिधला वर परियेसा ॥ ५० ॥

राजभेटी घेउनी । श्रीपाद आले गाणगाभुवनी ॥
योजना करिती आपुले मनीं । गौप्य रहावे म्हणूनिया ॥ ५१ ॥

म्हणे सरस्वती गंगाधर । श्रोतया करी नमस्कार ॥
कथा ऐका मनोहर । सकळाभीष्ट लाधेल ॥ ५२ ॥

॥ इति श्रीगुरुचरित्रकथाकल्पतरौ सिद्धनामधारकसंवादे द्विपंचाशत् श्लोकात्मकं गुरुचरित्र संपूर्णम् ॥